जा.क्र.नांवाशमनपा/नसका/CR-73/2014
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:-06.08.2014

**<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.</u>**

**<u>सर्वसाधारण सभेची सूचना</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची 'ड' चे प्रकरण-2 मधील
नियम क्र.1 अन्वये

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम 1949 चे अनुसूचि (ड) चे प्रकरण 2 मधील नियम क्र. 1 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापौर श्री.अ.सत्तार अ.गफुर यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची सर्व साधारण सभा दि.**14.08.2014** रोजी सकाळी **11.00** वाजता नांवाशमनपाकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील चौथ्या मजल्यावरील कै. शंकरराव चव्हाण सभागृहात आयोजित केली आहे.

करीता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारीत समयी निर्दिष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

**स्वाक्षरीत/-**
(मा.महापोर यांचे आदेशान्वये ) नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

प्रति,
श्री / श्रीमती ____________________
सदस्य / सदस्या, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**<u>कार्यक्रम पत्रिका</u>**

**विषय क्र.1:-**

नांदेड वाघाळा महानगरपालिका क्षेत्रातील मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची नोंद घेणे बाबत.

लिंग गुणोत्तर-2014

| अ.क्र. | महिना | एकुण जन्म | | एकुण | लिंग गुणोत्तर प्रतिहजार मुलींचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | | |
| 1. | जानेवारी | 1578 | 1467 | 3045 | 929.65 |
| 2. | फेब्रुवारी | 1522 | 1279 | 2801 | 840.34 |
| 3. | मार्च | 1695 | 1587 | 3282 | 936.28 |
| 4. | एप्रिल | 1090 | 981 | 2071 | 900.00 |
| 5. | मे | 1905 | 1701 | 3606 | 892.91 |
| 6. | जुन | 1570 | 1472 | 3042 | 937.57 |
| 7. | जुलै | 2511 | 2275 | 4786 | 906.01 |

**विषय क्र.2:-**

दिनांक : 26 मार्च, 1997 रोजी राज्य शासनाने नांदेड नगरपालिका व वाघाळा नगरपालिका क्षेत्र एकत्र करून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची स्थापना केली.

महानगरपालिकेची वाढती हद्द लक्षात घेता नागरिकांना मुलभूत सुविधा जसे - साफसफाई, गटार दुरूस्ती, नाल्यांची दुरूस्ती, रस्ते, पाणी पुरवठा, सार्वजनिक दिवाबत्ती, ड्रेनेज कनेकशन, जन्म मृत्यु नोंदणी, मालमत्ता कर इत्यादी बाबतच्या तक्रारी घेऊन मुख्य कार्यालयात येण्यासाठी जिकरीचे होत असल्याने कार्यालयीन आदेश

क्र.साप्रवि/आस्था-1/17191/98, दि.08.01.1999 अन्वये (05) क्षेत्रिय कार्यालयाची स्थापना करून सदर ठिकाणी सहाय्यक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली. तसेच महाराष्ट्र शासन, अधिसूचना, राजपत्र असाधार भाग (1) `अ` नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक : 01 जुलै, 2009 अन्वये मौ तरोडा (खु.) व मौ.तरोडा (बु.) ही महसुली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करण्यात आली. त्यानुसार क्षे.का.क्र.(06), ची स्थापना करण्यात आली.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची लोकसंख्या जनगणना 2011 प्रमाणे साधारणतः 5.50 ते 6.00 लक्षाच्या जवळपास असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 29 `अ` प्रमाणे क्षेत्रिय कार्यालयांची पुनर्रचना करून महानगरपालिकेच्या चार प्रभाग समित्यांची रचना करता येऊ शकेल अशी तरतुद आहे. सध्या महानगरपालिकेचे (06) प्रशासकीय क्षेत्रिय कार्यालय कार्यान्वीत आहेत. त्यामुळे त्यावर नियंत्रणास सक्षम अधिकारी व कर्मचारी देऊन नागरिकांना देण्यात येणा-या मुलभूत सुविधा योग्य त्या वेळात व प्रभावीपणे कार्य होण्यात अडचण ठरत आहे. त्याकरिता (03) क्षेत्रिय कार्यालयात शहरातील प्रशासकीय अधिकार देऊन शासन नियुक्त उप-आयुक्त अथवा मुख्याधिकारी `अ` वर्ग श्रेणीचे अधिकारी देऊन महानगरपालिकांची कामे जास्तीत जास्त लोकाभिमुख व तत्परतेने करता येतील व त्याप्रमाणे प्रभाव पडू शकतो.

1) क्षेत्रिय कार्यालयास लागणारा कर्मचारी वर्ग कमी लागेल, पर्यायाने आर्थिक बचत फायदेशीर ठरेल.
2) सध्या क्षेत्रिय कार्यालयात असणारे अपुरे कर्मचारी वर्गावर येणारा ताण कमी होईल.
3) उप-आयुक्त दर्जाचे अधिकारी प्रत्यक्ष प्रशासनात असल्याने नागरिकांना त्यांची कामे वेळेत पूर्ण होणे शक्य होईल व प्रभावीपणे कामात सुसूत्रता येऊ शकेल.
4) इतर मोठ्या महानगरपालिकाप्रमाणे क्षेत्रिय कार्यालयात प्रभाग समित्यांना अधिकार प्रदान करून नागरिकांचे प्रश्न सोडवणूक क्षेत्रिय कार्यालयातच होणे शक्य होईल.
5) नागरिकांना त्यांचे जास्तीत जास्त कामे ऑनलाईन करवून देण्याचे प्रयत्न करण्यात येतील.
6) जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान योजनेच्या रिफॉर्मनुसार महानगरपालिकेचे सर्व कामाचे संगणकीकरण करून नागरिकांना ऑनलाईन सर्व सोईसुविधा पुरविण्यात येतील, आता सध्या-
   1) जन्म-मृत्यु प्रमाणपत्र.
   2) मालमत्ता कर भरणा.
   3) पाणी कर वसुली.
   4) नगररचना विभागाचे बांधकाम परवाना.
7) कामाचे व अधिकाचे विकेंद्रीकरणात सुसूत्रतता आणून प्रभावी नियंत्रणाद्वारे क्षेत्रिय कार्यालयाना जास्तीत लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
8) प्रभाग समित्यांना अधिकार प्राप्तीमुळे कमी रक्कमेची कामे प्रभाग समित्या पार पाडू शकतील त्यामुळे नागरिकांना त्यांच्या तक्रारी घेऊन मुख्य कार्यालयापर्यंत येण्याची गरज पडणार नाही.

उपरोक्त बाब लक्षात घेता खालील प्रमाणे नवीन झोन कार्यालयाची पुनर्रचना करण्यासाठी प्रस्ताव महानगरपालिका सर्व साधारण सभेच्या निर्णयास्तव ठेवण्यात यावा.

| नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड | | | |
|---|---|---|---|
| झोन कार्यालयाची पुनर्रचना 1 **Commossioner Sir** | | | |
| **नवीन झोन कार्यालय** | **निवडणूक प्रभाग क्रमांक** | **वसूली वार्ड/ब्लॉक** | **मालमत्ता संख्या** |
| **A** | 1,7,2s part, 3s part, 8,6s part, 10s part, 9,15s part, 18, 17, | 1-1-11, 1-23, 12-1-8, 13-1-7 | 30172 |
| **B** | 2s part, 3s part, 5, 17, 18, 16, 15s part, 10s part,11, 14, 12, 13 | 1-12-22, 24-25, | 19316 |
| **C** | 24, 26, 25, 29, 27, 28, 32, 30, 31, 36, 38, 39, 40,35 | 2-1-12, 3-1-7, 4-1-6, 5-1-4, 6-1-4, 7-1-4, 8-1-4, 9-1-10 | 32539 |
| **D** | 34, 23, 22, 21, 25, | 10-1-4-, 11-1-10 | 16718 |

| | | | |
|---|---|---|---|
| | 20,19, 37,33 | | |
| | | | 98745 |

**विषय क्र.3-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कर, पाणी कर व इमारत भाडे वसुली ऑनलाइन करण्याची व्यवस्था उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे मालमत्ता कर वसुलीस योग्य प्रतीसाद प्राप्त होत आहे, कारण माहे एप्रिल ते जुन 2014 या कालावधीत महानगरपालिकेच्या मालमत्ता करात 10% सुट देण्यात आली आहे. परंतु ऑनलाईन कर वसुलीत सामान्य मालमत्ताधारक सहभागी होऊ शकला नाही, कारण अनेकांकडे डेबिट कार्ड वा क्रेडित कार्ड उपलब्ध नाहीत अथवा ते ऑनलाईन नेट बँकींग व्यवहार करण्यात असमर्थ असल्याने यामध्ये ते सहभागी होऊ शकले नाहीत. याबाबत सेतु सुविधा केंद्रामार्फत नागरिकांकडून रक्कम स्विकारुन नेट बँकींगद्वारे महानगरपालिका कराचा भरणा केला तर सामान्य नागरीकांना सुट योनजेचा लाभ मिळेल व सेतु सुविधा केंद्रानाही त्यापोटी रू.10000 पर्यंत रू.25.00 व रू.10000 च्या वरील रक्कमेस रू.50.00 प्रती व्यवहार मोबदला मालकाकडुन घेता येईल व सेतु सुविधा केंद्राला फक्त रु.6.75 पैसे खर्च होणार आहे, तसेच महानगरपालिका करांसह राज्य शासनाचे कर जसे राज्य शिक्षण कर, रोजगार हमी योना उपकर, अकृषिक कर व महाराष्ट्र इमारत कर (मोठया निवासी इमारतीवील कर) हेही वसुल होण्यास मदतीचे ठरेल व जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेच्या रिफॉर्मची कर वसुली उद्दीष्टे पुर्तता करण्यास साहयभुत ठरेल, व महानगरपालिकेस कोणताही खर्च करण्याची आवश्यकता पडणार नाही. करीता सेतु सुविधा केंद्रामार्फत मालमत्ता कर, पाणी कर व इमारत भाडे नगदी स्वरुपात स्विकारुन महानगरपालिकेस ऑनलाईन स्वरुपात भरणा करण्याची मान्यता देऊन प्रस्ताव याच सभेत कायम करण्यात यावा ज्यामुळे महानगरपालिकेच्या कामात सुलभता येणे कामी उपयोगी पडणारी व नागरीकांना कोणत्याही सुविधा केंद्रात कर भरण्याची सुविधा उपलब्ध होईल.

**विषय क्र.4:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने साल सन 2009-10 पासून दोन माध्यमिक शाळा शहरामधून सुरु केल्या असून मराठी माध्यमाची जंगमवाडी व उर्दू माध्यमाची खय्युमप्लॉट येथे आहे. सदर शाळांमधून इयत्ता 10 वी ची पहिली बॅच 2011-12 मध्ये सुरु होवून मार्च 2012 च्या S.S.C. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विद्यार्थ्यांनी दिली. सन 2013-14 मध्ये तीस-या बॅचच्या परीक्षेत माध्यमिक शाळा जंगमवाडीचा निकाल **77.50 %** व माध्यमिक शाळा खयुमप्लॉटचा निकाल 58.62% असा लागला आहे.

सदर दोन्ही शाळा हया म.न.पा.फंडातून विनाअनुदान तत्वावर चालविल्या जातात. शिक्षणाधिकारी यांचे मार्गदर्शन, शिक्षकांनी केलेले अध्यापन कार्य व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद हयातून हे यश संपादन केल्याचे दिसून येते. व सदर निकालामुळे महापालिका शाळांची प्रतिमा उंचावली आहे. तसेच उत्तरोत्तर महापालिका शाळांची अशीच प्रगती वाढण्यासाठी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रोत्साहीत करण्यासाठी गुणाणुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या दोन्ही माध्यमांच्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस रु. 10,000/-, रु. 7,000/- व रु. 5,000/-व शाळेस प्रति शाळा रु. 10,000/- प्रोत्साहनपर गुणवत्ता वृध्दीसाठी पारितोषिक म्हणून महापालिकेकडून देण्याबाबत सर्व साधारण सभेने प्रशासकीय प्रस्तावास मंजुरी द्यावी.

**विषय क्र.5:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगवी परिसरात गौतम नगर येथे लोकवस्ती असून 1 कि. मी. च्या परिसरात प्राथमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसल्याचे नागरीकांचे म्हणणे असून त्यानुसार सदर परिसरात शिक्षण विभागाने मे महिण्यात सर्वे केला असता 6 ते 14 वयोगटातील त्या परिसरात जवळपास 80 मुले आढळून आली, ज्यांना शाळेसाठी इतरत्र जावे लागते. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 अन्वये व पालकाच्या मागणीनुसार महानगरपालिकेने येथे शाळा सुरु करणे आवश्यक वाटते.

तरी सदर परिसरात RTE Act नुसार प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध करुन देणे कामी शाळा सुरु करण्यास सर्व साधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

**विषय क्र.6:-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड अंतर्गत शहर नियंत्रण कार्यक्रम सुरु आहे. सदरील कार्यक्रमातील खालील पदे रिक्त झाली असून सदरील पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. सदरील पदासाठी शैक्षणिक अर्हता वेतना खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित वेतन |
|---|---|---|---|
| 1. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (पद -2) | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची रसायनशास्त्र, जिवशास्त्र वा सुक्ष्म जिवशास्त्र या विषयातील पदवी.<br>ब) मान्यताप्राप्त संस्थेतील डीएमएलटी कोर्स उत्तीर्ण.<br>क) आर.एन.टी.सी. कार्यक्रमात एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | 10,000/- |

उपरोक्त पदांसाठी शासनाकडून 100 टक्के निधी सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड या समितीमध्ये वेतनपोटी निधी जमा होते. यामुळे म.न.पा. वर कोणताही आर्थिक भार येत नाही. करीता सदरील पदे भरण्यासाठी म.न.पा. सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्र.7:-**

मा.शिक्षण संचालक प्राथमिक, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.प्राशिसं/2013-14/पुन.प.नियुक्ती/ड-502/2908, दि.29.05.2014 अन्वये महानगरपालिका शिक्षण आस्थापनेवरील रिक्त असलेल्या प्राथमिक शिक्षकांची पदे भरण्यासाठी सीईटी-2010 मधील पुनर्पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या पाच उमेदवारांची यादी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस पाठविण्यात आली असून त्यांना आस्थापनेवर मुलाखती घेवून पदस्थापना देण्याबाबत कळविले आहे. सदर शिक्षक हे नवीन भरतीतील असून सुरुवातीस 3 वर्ष फक्त मानधन देय राहील. 3 वर्षाच्या समाधानकारक सेवेनंतर वेतन श्रेणीची नियुक्ती दिली जाते सदर उमेदवारांच्या पदस्थापनेस मान्यता न दिल्यास जिल्हास्तरावरील अतिरिक्त शिक्षक घेणे बंधनकारक राहील. त्यांच्या सेवा जास्त झालेल्या असल्याने व वेतन व सेवा निवृत्तीचा जास्तीचा बोजा महापालिकेस सहन करावा लागेल. तरी सदर यादीतील पदे भरण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

**विषय क्र.8:-**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.मभवा-20/1114/प्र.क्र.12/सेवा-9दिनांक 7 मे 2014 नुसार कार्यालयीन आदेश क्र.लेवि-लेखा-वेतन-3778-2014 दि.28 मे 2014 अन्वये महानगरपालिकेतील कार्यरत कर्मचा-यांना दि.1 मे 2024 पासून मूळ वेतन व वेतन ग्रेड यावर 100 टक्के दराने महागाई भत्ता लागू करण्यात आला त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.

**विषय क्र.9:-**

विष्णुपूरी येथे वैद्यकिय महाविद्यालयाचे रुग्णालय संकुल लवकरच कार्यरत होणार असून सदर परिसरामध्ये साधारणतः प्रतिमहा 20 टन कोरडा कचरा निर्माण होणार असून या कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेच्रूया अधिकृत डम्पींग यार्डमध्ये कचरा टाकण्याच्या संदर्भात परवानगी देण्याकरीता आवश्यकतो करारनामा करण्यास वैद्यकिय महाविद्यालय तयारअसून याबाबत त्वरीत परवानगी देणयाची विनंती केली आहे.

तरी याकार्यान्वीत होणा-या डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे रुग्णालय संकुल परिसरामध्ये निर्माण होणा-या साधारणतः प्रतिमहा 20 मॅ.टन कोरडया कच-याचे विल्हेवाट लावण्यासाठी मनपाच्या मालकीचे मौजे तुप्पा ता.जि.नांदेड येथील गट क्र.372 मधील 9.89 हे.आर.जागेत नियोजित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्याठिकाणी कचरा टाकण्यासाठी परवानगी देणे आवश्यक आहे,यासाठी योग्य ते दर आकारण्याचे व करारनामा करण्याचे अधिकार आयुक्तांना प्रदान करण्याच्या मान्यतेस्तव.

**विषय क्र.10-**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 मनपा नांदेड यांनी शहरातील नगरोत्थान / jnnurm योजने अंतर्गत रस्ता रुंदीकरणातील मालमत्ता पाडण्यास विरोध करुन शासकिय कामात अडथळा निर्माण केल्याची तक्रार श्री गणेश रामराव शिंगे, नियंत्रक अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभाग मनपा नांदेड यांनी मालमत्ता क्रमांक 2-10-63 ही मालमत्ता रस्तारुंदी करणात बांधीत होणारी मालमत्ता काढण्यासाठी देवगांवचाळ रोड, मटन मार्केट लगत गेले असता श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 हे घटनास्थळ येथे येथे त्यांच्या अंगावर धाऊन येवुन मारण्यासाठी हात उगारुन धरला हात लावून दाखव हात तोडून टाकतो म्हणुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी देत होता. व रस्ता रुंदीकरण बाधीत मालमत्ता पाडण्यास विरोध करुन शासकिय कामात अडथळा निर्माण केला व मालमत्ता पाडण्याचे काम बंद पाडले. अशी तक्रार सादर केली होती.

त्या अनुषंगाने श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 यांचे विरुध्द पोलीस स्टेशन वजिराबाद, नांदेड येथे पहिली खबर क्रं. 5/2012 दि. 13.01.2012 अन्वये गुन्हा नोंदविला असून श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 यांचे विरुध्द भा.द.वि. 353, 352, 504, व 506 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. वरील प्रकरणी श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रं. 1 यांना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/10451/11 दिनांक 16.01.2012 अन्वये निलंबीत करण्यात आले आहे. श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांच्या विरुध्द निलंबन प्रकरणी कार्यालयीन ज्ञापन क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/11500/12 दिनांक 05.03.2012 अन्वये ज्ञापन व दोषारोप जोडपत्र 1 ते 4 बजावून 10 दिवसाचे आत खुलासा मागविण्यात आला होता. श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांनी दिनांक 06.03.2012 अन्वये त्यांनी त्यांच्यावर लावलेले जोडपत्र 1 ते 4 मधील दोषारोप मान्य नाही असे नमुद करुन त्यांना चौकशीच्या अधिन राहुन कामावर रुजु करुन घ्यावे म्हणून विनंती केली. श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांच्या विनंती अर्जानुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/11944/12 दिनांक 26.03.2012 अन्वये संबंधीतास विभागीय चौकशी व न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून पुनस्थापित करण्यात आले होते परंतु तत्कालीन आयुक्त यांनी सदरचा आदेश का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/844/ 2012 दिनांक 14.5.2012 अन्वये दि. 26.03.2012 रोजी पुनःस्थापित करणे बाबत निर्गमीत केलेले आदेश पुर्वलक्षप्रभावाने रद्द करण्यात आले. तदनंतर श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांनी दि. 15.05.2012 रोजी सेवेत पुस्थापित करणे बाबत विनंती केल्यामुळे संबंधीतास कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-2/997/12 दिनांक 21.05.2012 अन्वये विभागीय चौकशीच्या व न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहुन पुनस्थापित करण्यात आले. व संबंधीत हे दिनांक 21.05.2012 रोजी कामावर रुजु झाले आहे.

श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांचे विरुध्द निलंबन प्रकरण त्यांनी त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप अमान्य करण्यात आल्यामुळे विभागीय चौकशी आदेशीत करुन का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/1515/12 दि. 14.06.12 अन्वये श्री एम.एच. कोमटवार सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी तथा चौकशी अधिकारी मनपा यांची नियुक्ती करण्यात आली.त्यानुसार चौकशी अधिकारी श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांची चौकशी करुन चौकशी अहवाल क्रमांक 2012/विचौ/सिआर-217/ दि. 20.08.2013 अन्वये चौकशी करुन चौकशी अहवाल खालील प्रमाणे सादर केला. उपचारी कर्मचारी यांच्यावर जोडपत्र 1 ते 4 नुसार खालील प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले होते.

**जोडपत्र 1 नुसार**

1) बाधीत मालमत्ता पाडतांना विरोध करणे.

2) सरकारी कामात अडथळा निर्माण करणे

3) मालमत्ता पाडणा-यास धमकी देणे व शिवीगाळ करणे

4) पोलीस स्टेशन वजिराबाद येथे गुन्हा नोंद झाल्या बाबत.

वरील दोषारोपा बाबत चौकशी अधिकारी यांनी चौकशी करुन अहवाल सादर केला असता संबंधीता विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपाचा खालील प्रमाणे निषकर्ष काढून अहवाल सादर केला आहे.

| दोषारोप क्रं. | दोषारोप | चौकशी अधिका-यांचे निषकर्ष |
|---|---|---|
| 1 | बाधीत मालमत्ता पाडतांना विरोध करणे | सिध्द होते |
| 2 | सरकारी कामात अडथळा निर्माण करणे | सिध्द होते |
| 3 | मालमत्ता पाडणा-यास धमकी देणे व शिवीगाळ करणे | सिध्द होत नाही |
| 4 | पोलीस स्टेशन वजिराबाद येथे गुन्हा नोंद झाल्या बाबत | सिध्द होते. |

श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांचे विरुध्द वरील प्रमाणे चौकशी अधिकारी यांच्या अहवालानुसार 4 पैकी 3 दोषारोप सिध्द होत असल्यामुळे संबंधीतास कार्यालयीन कारणे दाखवा नोटीस क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/14502/13 दिनांक 01.10.2013 अन्वये सदरची बाब विचारात घेता संबंधीत हे मनपा कार्यालयात सहाय्यक आयुक्त या पदावर कार्यरत असून सदरील पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडतांना त्यांनी ते सपशेल अपयशी ठरला आहे तसेच सहाय्यक आयुक्त या पदावर कार्यरत असणा-या अधिका-यांनी अशा प्रकारचे कर्तव्य करणे अतिशय बेजबाबदार पणाचे आहे या सुपूर्ण प्रकरणामुळे जनमानसात महानगरपालिकेची प्रतिमा मलीन झालेली असून सदरची बाब अतिशय गंभीरस्वरुपाची असून कार्यालयीन शिस्तीच्या विरुध्द असल्यामुळे त्यांचे विरुध्द महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56 अन्वये शिस्तभंग विषयक कार्यवाही का करण्यात येवू नये या बाबतचा कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा मागविण्यात आला होता.

श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांनी सदरील नोटीसच्या संदर्भात दिनांक 17.10.2013 रोजी खुलासा सादर केला व संबंधीतानी मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे या बाबत रिट याचिका क्रं. 8979/2013 दाखल केले होते. सदरील यांचिका मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद यांनी दिनांक 13.11.2013 रोजी संबंधीतांनी दाखल केलेली याचिका मा. न्यायालयाने खारीज केली आहे.

करिता श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांचे विरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप 4 पैकी 3 विभागीय चौकशीअंती सिध्द झाले आहेत. तसेच संबंधीता विरुध्द शहरातील नागरीकांच्या लेखी व तोंडी अनेक तक्रारी आलेल्या आहेत. वरील सर्व बाब विचारात घेता संबंधीत हे जबरशिक्षेस पात्र आहे हे सिध्द होत आहे. जर संबंधीतास जबर शिक्षा नाही दिली तर इतर अधिकारी व कर्मचारी हे ही त्यांच्या प्रमाणे वर्तन करतील.

त्यामुळे श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांच्या विरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) मधील तरतुदीनुसार संबंधीतांना जबर शिक्षा देणे आवश्यक असल्यामुळे खालील प्रमाणे शास्ती प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) (क) नुसार खालच्या पदावर किंवा खालच्या समयश्रेणीत आणणे किंवा समयश्रेणीतील खालच्या टप्प्यावर आणणे.

2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) (ग) नुसार पुढे नौकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे नगरपालिकेच्या सेवेतुन काढून टाकणे.

वरील तरतुदी नुसार जबर शिक्षा लादण्यासाठी व संबंधीत हे सहाय्यक आयुक्त या पदावर कार्यरत असल्यामुळे शास्ती लादण्याचे अधिकार सर्व साधारण सभेस असल्याने श्री प्रकाश माधवराव येवले सहाय्यक आयुक्त यांना वरील पैकी 56(2) (क) अथवा 56(2) (ग) पैकी एक शिक्षा लावणे आवश्यक आहे कारण की, या शिक्षेमुळे इतर अधिकारी/कर्मचारी महानगरपालिकेच्या विकास कामा मध्ये अडथळा निर्माण करणार नाहीत. याबाबत महानगरपालिकेचा नागरीका मध्ये संदेश जाईल या हेतुने वरील प्रमाणे संबंधीतास एक शिक्षा लादण्याच्या निर्णय घेणेसाठी प्रस्ताव महानगरपालिका सर्व साधारण सभे समोर ठेवण्यात यावा.

**स्वाक्षरीत/-**
नगरसचिव,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.